# मंत्रिमंडळ निर्णय

## बैठक क्र. २०० व २०१

(विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशन (मुंबई) कालावधीतील बैठका)

## दिनांक : १९ ते ३० नोव्हेंबर २०१८

| बैठक क्रमांक | दिनांक | ठिकाण | निर्णयांची संख्या |
|---|---|---|---|
| २०० | १८ नोव्हेंबर | सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल (अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला) | १० |
| २०१ | २९ नोव्हेंबर | विधानभवन, मुंबई | १५ |

# दि. १८ नोव्हेंबर २०१८
# मंत्रिमंडळ निर्णय
# (एकूण-१०)

आदिवासी विकास विभाग

<u>आदिवासी विद्यार्थ्यांच्या हितासाठी निर्णय</u>

## शासकीय आश्रमशाळा-वसतीगृहांमधील रिक्त पदांसाठी विशेष भरती प्रक्रिया

आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी दुर्गम आदिवासी भागातील शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहांमधील शिक्षक व शिक्षकेतर या संवर्गाची एकूण २६८३ रिक्त पदे भरण्यासाठी विशेष भरती प्रक्रिया राबविण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

आदिवासी विकास विभागांमार्फत ५०२ शासकीय आश्रमशाळा चालवल्या जातात. नाशिक, ठाणे, नागपूर व अमरावती या चार विभागीय कार्यालयांसह २९ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयांमार्फत आश्रमशाळांवर नियंत्रण ठेवले जाते. आजच्या निर्णयामुळे आश्रमशाळा व वसतीगृहांतील आवश्यक पदांसाठी अनुभवी, शैक्षणिक अर्हता धारण करणारे, स्थानिक तसेच बोलीभाषा जाणणारे आणि त्या परिसरात राहण्यास इच्छुक असणारे कर्मचारी मिळणे शक्य होणार आहे. त्यानुसार शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहांमधील वर्ग ३ संवर्गातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची १०० टक्के रिक्त पदे भरण्यात येतील.

आदिवासी विकास विभागांच्या आश्रमशाळा व वसतीगृहे अत्यंत दुर्गम व डोंगराळ भागात असून त्या निवासी असल्याने शिक्षकांना शाळा परिसरात निवासी रहावे लागते. त्यामुळे भरतीद्वारे नियुक्त झालेले शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी अन्य ठिकाणी नियुक्ती मिळाल्यानंतर शासकीय सेवा सोडून जातात, तर काही कर्मचारी दळणवळणाच्या सोयी असणाऱ्या अन्य आश्रमशाळांवर बदली करुन घेतात. त्यामुळे शासकीय आश्रमशाळा-वसतीगृहांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अनेक पदे रिक्त राहतात.

दुर्गम, अतिदुर्गम व डोंगराळ भागात सुरु असलेल्या आश्रमशाळा व वसतीगृहांमधील माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गांसाठी विषयनिहाय तज्ज्ञशिक्षक आवश्यक असल्याने उपलब्ध शिक्षकांना अतिरिक्त काम देऊन त्यांच्याकडून शिकविण्याचे काम करुन घेणे शक्य होत नाही. त्यामुळे आवश्यकतेप्रमाणे विषयनिहाय शिक्षकांची नियुक्ती तासिका तत्त्वावर आणि अधीक्षकांसह अन्य शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती मानधन तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात करावी लागते. शंभर टक्के रिक्त पदे भरण्याच्या आजच्या निर्णयामुळे आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही.

-----o-----

नागरी जमीन कमाल धारणा निरसन अधिनियम

## सूट देण्यात आलेल्या जमिनी किंमत आकारुन गृहनिर्मितीसाठी उपलब्ध

नाजकधा निरसन अधिनियमाच्या कलम २० नुसार गृहबांधणी, भूखंड विकास, औद्योगिक, कृषि यांच्यासह इतर प्रयोजनार्थ सूट देण्यात आलेल्या जमिनी विशिष्ट किंमत आकारुन गृहनिर्मितीसाठी संबंधितांस उपलब्ध करुन देण्याबाबत समितीने केलेल्या शिफारसी स्वीकारण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) निरसन अधिनियम-१९९९ मधील तरतुदींबाबत सर्वोच्च न्यायालयाकडे विशेष अनुमती याचिका प्रलंबित आहे. ही याचिका विचारात घेऊन मूळ अधिनियमाच्या कलम २० अन्वये सूट देण्यात आलेल्या जमिनींसह अन्य बाबींसंदर्भात श्री.बी.एन. श्रीकृष्ण व श्री.बी.एन. मखिजा यांच्या द्विसदस्यीय समितीने केलेल्या शिफारसींबाबत मंत्रिमंडळाने महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. त्यानुसार सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुमती याचिकेमधील अंतरिम निर्णयाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेली परिस्थिती आणि निरसन अधिनियमातील कायदेशीर तरतुदी विचारात घेऊन रखडलेल्या योजना पूर्ण करण्यासाठी द्विसदस्यीय समितीने सादर केलेला अहवाल स्वीकारण्यात आला आहे.

नाजकधा निरसन अधिनियमाच्या कलम २० अन्वये सूट देण्यात आलेल्या जमिनींना संरक्षण देण्यात आले आहे. या अधिनियमाच्या वैधतेबाबत सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका प्रलंबित आहे. या याचिकेच्या अधीन राहून गृहबांधणी, भूखंड विकास, औद्योगिक, कृषि यांच्यासह इतर प्रयोजनार्थ सूट देण्यात आलेल्या जमिनी विशिष्ट किंमत आकारुन गृहनिर्मितीसाठी संबंधितांस उपलब्ध करुन देण्याबाबत समितीने शिफारसी केल्या आहेत. या शिफारसी सर्वोच्च न्यायालयात दाखल करुन त्यानुसार होणाऱ्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यास आज मान्यता देण्यात आली.

यामध्ये वार्षिक बाजारमूल्य दर तक्त्यानुसार औद्योगिक सुटीखालील क्षेत्रासाठी १५ टक्के आणि गृहबांधणी, कृषी व इतर प्रयोजनार्थ सुटीखालील क्षेत्रासाठी १० टक्के तसेच गृहबांधणी व तळेगाव दाभाडे योजनेमधून निर्माण झालेल्या इमारतींच्या पुनर्विकासासाठी २.५ टक्के दराने किंमत आकारुन असे क्षेत्र पुनर्विकासासाठी उपलब्ध करुन देण्याचा समावेश आहे. याशिवाय सजावटीच्या बगीच्यांसाठी सूट देण्यात आलेल्या क्षेत्राचा चटई क्षेत्र निर्देशांक वापरण्यात येणार नसल्यास २.५ टक्के आणि असे चटई क्षेत्र वापरण्यात येणार असल्यास १० टक्क्यांप्रमाणे किंमत आकारण्यात येणार आहे. कलम २० खाली सूट देण्यात आलेल्या जमिनीवर अधिसूचित झोपडपट्टी असल्यास असे क्षेत्र विकसनासाठी उपलब्ध करुन देताना वार्षिक बाजारमुल्य दर तक्त्यामधील दराच्या ५ टक्के किंमत आकारण्याचे निश्चित करण्यात आले.

नाजकधा कलम २० अन्वये सूट देण्यात आलेल्या योजनांबाबत सर्वोच्च न्यायालयासमोर प्रलंबित असलेल्या बाबींशिवाय इमारतींच्या पुनर्विकासास परवानगी देणे, जमिनीच्या अधिकार अभिलेखातील नोंदीची दुरुस्ती करणे इत्यादीबाबत समितीने केलेल्या शिफारसी स्वीकारण्यास व अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात आली. या सर्व बाबींमधून शासनास उपलब्ध होणारा निधी हा एकत्रित किंवा संचित निधीत जमा करुन त्यातून गृहनिर्माण व अनुषंगिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यास मान्यता देण्यात आली.

-----o-----

सामाजिक न्याय विभाग

वैधानिक कार्यवाहीसाठी मंत्रिमंडळ उपसमिती

**मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत**
**मागासवर्ग आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्या**

मराठा समाजाचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपण व शासकीय नोकऱ्यांमध्ये असलेले प्रमाण याविषयी राज्य मागासवर्ग आयोगाने अहवाल दिला असून त्याच्या खंड-३ मधील अंतिम शिफारशी पूर्णत: स्विकारण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

या शिफारशींमध्ये पुढील बाबींचा प्रामुख्याने समावेश आहे. त्यात The Maratha Class of Citizens is declared as Socially and Educationally Backward Class of Citizens (SEBC) and has inadequate representation in the services under the State. Maratha Class of Citizens having been declared Socially and Educationally Backward Class of citizens are entitled to reservation benefits and advantages enshrined in the Article १५(४) & १६(४) of the constitution of India. Looking to the exceptional circumstances and extra ordinary situations generated on declaring Maratha Class of Citizens as Socially and Educationally Backward and their consequential entitlement to the reservation benefits, the Government may take an appropriate decision within the Constitutional provisions to address the emerging scenario in the State या शिफारशींचा समावेश आहे.

नागरिकांचा सामाजिक व शैक्षणिक मागासवर्ग "Socially and Educationally Backward Class of Citizens" (SEBC) हा स्वतंत्र वर्ग निर्माण करुन त्यामध्ये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मराठा सामाजाचा समावेश करण्यात येणार आहे. तसेच सध्याच्या असाधारण व अपवादात्मक परिस्थितीमध्ये या वर्गाला ५० टक्के मर्यादेच्या बाहेर जाऊन स्वतंत्रपणे आरक्षण देण्यास मान्यता देण्यात आली. यापुढील सर्व वैधानिक कार्यवाही करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यासही मान्यता देण्यात आली.

-----०-----

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळास ५०० कोटी

## सहकारी संस्थांसाठी अटल अर्थसहाय्य योजनेस मान्यता

सहकारी संस्थांच्या बळकटीकरणाबरोबरच सहकारी संस्थांतर्गत सहकारास चालना देण्याच्या दृष्टीने सहकारी संस्थांसाठी अटल अर्थसहाय्य योजना ही नवीन योजना सुरू करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी नोडल एजन्सी म्हणून महाराष्ट्र सहकार विकास महामंडळास मान्यता देण्यासह या महामंडळास भागभांडवल स्वरुपात ५०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

शेतमाल उत्पादक ते ग्राहक या दरम्यान असलेल्या मुल्य साखळीतील सर्व घटकांचा विचार करून यामध्ये असलेल्या व्यवसाय संधींचा विकास करण्यात येणार आहे. या मुल्य साखळीतील शेतकरी आणि ग्राहक यांचा वाटा वाढविण्याबरोबरच शेतीपूरक व्यवस्था मजबूत करण्यासाठी स्थानिक गरजांनुसार नाविण्यपूर्ण प्रकल्पांसाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. त्यानुसार शेतकऱ्यांच्या शेतमालावर प्राथमिक व दुय्यम प्रक्रिया करून मुल्यवर्धन करणाऱ्या सहकारी संस्थांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. शेतमाल उत्पादनांतून शेतकऱ्यांचा नफा वाढविण्यासाठी तसेच त्यांच्या उत्पन्नातील वाढीसाठी सहकारी संस्थांना स्थानिक स्तरावर प्रक्रिया आणि विक्री व्यवस्था उभारता येणार आहे. या योजनेमुळे राज्यातील विशेषत: ग्रामीण भागातील सुशिक्षित तरुणांना सहकारी संस्थांमार्फत कृषी क्षेत्राशी व स्थानिक गरजेशी संबंधित सेवा, व्यवसाय व उद्योगधंदे उभे करणे शक्य होणार आहे. तसेच या माध्यमातून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील. आदिवासी बहुल भाग आणि आत्महत्याप्रवण जिल्ह्यांच्या गरजा विचारात घेऊन अशा प्रकारच्या सहकारी संस्थांना विशेष मदत करण्यात येणार आहे.

या योजनेत प्रत्येक प्रकल्पामध्ये भाग घेणाऱ्या नोंदणीकृत सहकारी संस्थांचे स्वत:चे भागभांडवल, शासकीय कर्ज आणि अनुदान यांचे प्रमाण हे विभागाच्या इतर चालू योजनांमध्ये मंजूर करण्यात आलेल्या भागभांडवल, कर्ज व अनुदान याच्या प्रमाणाची पार्श्वभूमी ठरविण्यासाठी वित्त मंत्री व सहकार मंत्री आणि मुख्य सचिव यांची समिती करण्यात येणार आहे. या समितीच्या मान्यतेनंतर संबंधित निधीचे प्रमाण ठरविण्यात येणार आहे.

-----०-----

वित्त विभाग

## महाराष्ट्र हमी विमोचन निधीच्या स्थापनेस मान्यता

महाराष्ट्र हमी विमोचन निधी योजनेंतर्गत महाराष्ट्र हमी विमोचन निधी (Guarantee Redemption Fund) स्थापन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. विविध विकासकामे आणि लोककल्याणासाठी विविध वित्तीय संस्थांकडून घेण्यात आलेल्या कर्जाला शासनाकडून दिलेल्या हमीची परतफेड करण्यासाठी या निधीचा वापर केला जाणार आहे. यामुळे हमी परतफेडीसाठी अर्थसंकल्पीय तरतुदीची आवश्यकता भासणार नाही. तसेच शासनाची खुल्या बाजारातील पतदेखील चांगली राहणार आहे.

महाराष्ट्र हमी विमोचन निधीची स्थापना झाल्यानंतर २०१८-१९ या वित्तीय वर्षामध्ये सुरूवातीचे अंशदान म्हणून मागील वर्षाअखेरीस शिल्लक हमी रक्कमेच्या १ टक्के रक्कम  म्हणजेच २६६ कोटी ५७ लाख वर्गणी स्वरुपात उपलब्ध करुन दिली जाणार आहे. त्यानंतर २०१९-२०२० पासून मागील वर्षातील शासनाने हमीपोटी दिलेल्या रक्कमेच्या शिल्लक रक्कमेच्या ०.५ टक्के रक्कम पुढील ८ वर्षे पाच टक्क्यांच्या (त्यावेळेसच्या शिल्लक हमी रक्कमेच्या) मर्यादेपर्यंत प्रतिवर्षी जमा केली जाणार आहे. एखादी हमीची रक्कम वित्तीय संस्थेला दिल्यानंतर निधीची मर्यादा पुन्हा ५ टक्के होईपर्यंत प्रतिवर्षी ०.५ टक्के (मागील वर्षाच्या शिल्लक हमी रक्कमेच्या) वर्गणी स्वरुपात या निधीमध्ये जमा करण्यात येईल. त्याचप्रमाणे शासनाने वेळोवेळी दिलेल्या हमी बाबतचे हमी शुल्कदेखील या निधीमध्ये जमा करण्यात येणार आहे.

या निधीतून वित्तीय संस्थेला रक्कम देण्यासाठी शिफारस करण्याचे अधिकार वित्त विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील समितीला असणार आहेत. या समितीच्या शिफारशींच्या आधारे व्यय अग्रक्रम समितीच्या माध्यमातून वित्तीय संस्थांना रक्कम मंजूर केली जाणार आहे.

-----o-----

अल्पसंख्याक विकास विभाग

## मालेगाव येथे अल्पसंख्याक समाजासाठी नवीन आयटीआय

नाशिक जिल्ह्यातील मालेगाव येथे अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी नवीन शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) उभारणीस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या संस्थेमध्ये ४६० प्रवेश क्षमतेच्या २ तुकड्यांचे १० अभ्यासक्रम सुरु करण्यात येणार आहेत. संस्थेतील ७० टक्के जागा या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी तर ३० टक्के जागा सर्वसाधारण व राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी असतील. या संस्थेसाठी ११ कोटी ४१ लाख रुपयांचा निधी आवर्ती व अनावर्ती खर्चासाठी मंजूर करण्यात आला आहे. तसेच या बैठकीत आयटीआयसाठी आवश्यक २५ शिक्षकीय पदे, १५ शिक्षकेत्तर पदे व चार ठेका पद्धतीने पदे भरण्यास देखील मान्यता देण्यात आली. या पदांना उच्चाधिकार समितीने मान्यता दिल्यानंतर ती कौशल्य विकास व उद्योजकता विभागास वर्ग करण्यात येणार आहेत.

-----o-----

महसूल विभाग

## धर्मदाय संस्थांना जमिनी प्रदान करण्यासंदर्भातील धोरण निश्चित

सामाजिक, सांस्कृतिक, वैद्यकीय, शैक्षणिक, धर्मशाळा, अनाथालये किंवा अन्य धर्मादाय प्रयोजनांसाठी शासकीय जमिनींचे वाटप करण्यासाठी अवलंबावयाच्या कार्यपद्धतीबाबतच्या धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----०-----

महसूल विभाग

## विना परवानगी खरेदी-विक्री झालेल्या जमिनींचे व्यवहार रेडी रेकनरच्या ५० टक्क्यांपर्यंत रक्कम आकारुन नियमानुकूल

अतिरिक्त ठरवून वाटप केलेल्या परंतु विना परवानगी कृषिक अथवा अकृषिक कारणासाठी खरेदी-विक्री झालेल्या जमिनीचे व्यवहार प्रचलित वार्षिक दर विवरणपत्रानुसार येणाऱ्या जमिनीच्या किंमतीच्या जास्तीत-जास्त ५० टक्क्यांपर्यंत रक्कम आकारुन नियमानुकूल करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम-१९६१ मधील तरतुदीनुसार अतिरिक्त ठरवून वाटप केलेल्या अशा जमिनी नियमानुकूल करण्यासाठी या अधिनियमाच्या कलम २९ मध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.

-----०-----

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## रायगड येथे विजयभूमी युनिव्हर्सिटीच्या स्थापनेस मान्यता

रायगड जिल्ह्यातील जामरुग (ता. कर्जत) येथे विजयभूमी युनिव्हर्सिटी, रायगड हे स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठ २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या विद्यापीठाची स्थापना करण्यासंदर्भात विधानमंडळासमोर सादर करावयाच्या विधेयकाच्या मसुद्यासही यावेळी मान्यता देण्यात आली.

-----०-----

गृह विभाग

## व्यापक जनहिताच्या दृष्टिकोनातून शिक्षा आणि दंडाच्या स्वरुपात दुरुस्ती

व्यापक जनहिताच्या दृष्टिकोनातून भारतीय दंड संहिता-१८६० च्या कलम २७२ ते २७६ मधील शिक्षा आणि दंडाच्या स्वरुपात दुरुस्ती करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

फौजदारी प्रक्रिया संहिता-१९७३ च्या पहिल्या अनुसूचित (अपराधाचे वर्गीकरण) प्रकरण १४ वे "सार्वजनिक आरोग्य, सुरक्षितता, सोय, सभ्यता व नीतिमत्ता यांना बाधक असे अपराध" या शीर्षाखाली असलेल्या तरतुदी महाराष्ट्र राज्यास लागू आहेत. त्यात कलम २७२ ते २७६ मधील अपराध या स्तंभापुढील शिक्षा व त्यापुढील स्तंभामध्ये दुरुस्ती करण्याबाबतच्या प्रस्तावास आजच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----०-----

# दि. २९ नोव्हेंबर २०१८
# मंत्रिमंडळ निर्णय
# (एकूण-१५)

ऊर्जा विभाग

ग्रामपंचायत, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्र

**पायाभूत सुविधांसाठी आकारण्यात येणाऱ्या करातून**
**शासकीय विद्युत कंपन्यांना वगळण्याचा निर्णय**

ग्रामपंचायत, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात उभारण्यात येणाऱ्या विद्युत वितरण पायाभूत सुविधांसाठी संबंधित संस्थांकडून आकारण्यात येणाऱ्या करातून शासकीय विद्युत कंपन्या तसेच त्यांच्या फ्रँचाईझींना वगळण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला.

शासकीय विद्युत कंपन्या तसेच त्यांच्या फ्रँचाईजींकडून ग्रामपंचायत, नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रात उपरी वाहिनी, भूमिगत वाहिनी, वितरण रोहित्र, विद्युत खांब, विद्युत मनोरे, पारेषण वाहिन्या इत्यादी पायाभूत सुविधा उभारण्यात येतात. या सुविधांच्या उभारणीसाठी शासकीय विद्युत कंपन्यांकडून संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत कराची वसुली केली जाते. अशा प्रकारची कर आकारणी करण्यात येऊ नये यासाठी संबंधित अधिनियम, नियम आणि आदेश यामध्ये योग्य ती सुधारणा करण्यासही आज मान्यता देण्यात आली.

महावितरण कंपनीची फ्रँन्चाईजी असलेल्या मेसर्स टोरेन्ट पॉवर कंपनीने भिवंडी-निजामपूर शहरामध्ये २००७-०८ ते २०१८-१९ या कालावधीत वितरण रोहित्र, एल.टी.पोल, एच.टी.पोल, भूमिगत वाहिन्या यांची उभारणी केली आहे. या सुविधांसाठी महानगरपालिकेने आकारलेला २८५ कोटी ५ लाख रुपयांचा (मूळ रक्कम ७१.३८ कोटी आणि व्याज २१३.६७ कोटी रुपये) मालमत्ता कर भरण्याबाबतची नोटीस रद्द करण्यासही आज मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार नगर विकास विभागाकडून विशेष अधिसूचना काढण्यात येईल. तसेच यापुढे वीज वितरण प्रणालीच्या विद्युत पायाभूत सुविधांवर कर आकारणी करण्यात येऊ नये यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम-१९४९ मध्ये आवश्यक ती सुधारणा केली जाणार आहे.

-----०-----

वैद्यकीय शिक्षण विभाग

**अतिविशेषोपचार केंद्रासाठी लागणाऱ्या**
**आवश्यक पदांच्या निर्मितीस मान्यता**

मुंबईच्या शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयात अतिविशेषोपचार केंद्र सुरू करण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक पद निर्मितीस आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयास अतिविशेषोपचार केंद्र सुरु करण्यासाठी आवश्यक बांधकाम, शस्त्रक्रिया विभागाचे नूतनीकरण आणि इतर कामांसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. हे बांधकाम जवळपास पूर्ण झाले असून या केंद्रासाठी विविध यंत्रसामग्री खरेदी करण्यासाठी देखील प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या केंद्रामार्फत मुखकर्करोग पिडीत रुग्णांबरोबरच अपघातग्रस्त रुग्ण आणि जन्मत: व्यंग असलेल्या रुग्णांवर उपचार केले जाणार आहेत. वैद्यकीय-दंत शाखेच्या पदवीपूर्व व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना अशा प्रकारच्या उपचाराच्या शिक्षणाचा लाभ होणार आहे. त्यामुळे

अतिविशेषोपचार केंद्रासाठी नियमित स्वरुपातील ११ पदांच्या निर्मितीसाठी येणाऱ्या ७० लाख रुपयांच्या वार्षिक आवर्ती खर्चासह काल्पनिक स्वरुपातील ८ पदे निर्माण करण्यासही मान्यता देण्यात आली.

-----०-----

महसूल विभाग

## महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियमांमध्ये सुधारणेस मान्यता

शासकीय यंत्रणेला खाणकामासाठी अधिकची तांत्रिक क्षमता आणि मनुष्यबळ उपलब्ध होण्यासाठी सार्वजनिक प्राधिकरण किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या यंत्रणेच्या नावे खाणपट्टे मंजूर करण्याची तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियमांमध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

आजच्या निर्णयानुसार महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम-२०१३ च्या नियम ९ च्या उप नियम (१) मधील दुसऱ्या परंतुकामध्ये “to any public authority” या शब्दांऐवजी “in the name of any public authority or any agency nominated by it” या शब्दांचा समावेश करण्यास मान्यता देण्यात आली. यासंदर्भातील नियमाचा मसुदा विधि व न्याय विभागाच्या सल्ल्याने अंतिम करुन प्रसिद्ध करण्यात येईल.

-----०-----

महसूल विभाग

## शत्रू संपत्तीविषयक समन्वयाची जबाबदारी आता महसूल विभागाकडे देण्यास मान्यता

राज्यातील शत्रू संपत्ती मिळकतीचे सर्वेक्षण तसेच या संपत्तीचे संरक्षण व व्यवस्थापन करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांशी समन्वय ठेवण्याबाबत केंद्र शासनाने निर्देश दिले आहेत. त्यानुसार राज्यातील शत्रू संपत्तीच्या समन्वय व निरीक्षणासाठी समन्वय अधिकारी म्हणून महसूल विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यादृष्टीने शत्रू संपत्ती अधिनियम-१९६८ हा विषय महसूल व वन विभागाच्या विषयसूचीमध्ये समाविष्ट करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १६६ च्या खंड (३) मधील अधिकारानुसार महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या अनुसूचीतील पहिल्या अनुसूचीमध्ये महसूल विभागाला नेमून दिलेल्या विषयांमध्ये “महाराष्ट्र राज्यातील शत्रू संपत्तीविषयक समन्वय” हा विषय दर्शविण्यास आज मान्यता देण्यात आली.

-----०-----

जलसंपदा विभाग

## कार नदी प्रकल्पाच्या ३५२ कोटी ६३ लाख किंमतीस मंत्रिमंडळाकडून चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता

वर्धा जिल्ह्याच्या कारंजा (घा) तालुक्यातील कार नदी प्रकल्पाच्या ३५२ कोटी ६३ लाख रुपयांच्या किंमतीस आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

वर्ष २०१६-१७ च्या दरसूचीवर आधारित सुधारित मान्यता देण्यात आलेल्या कार नदी प्रकल्पामध्ये आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा समावेश शासन मान्यतेशिवाय करता येणार नाही. आजच्या निर्णयानुसार प्रगतीपथावरील निविदांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात येतील. तसेच पाणीसाठ्याचा सिंचनासाठी जास्तीत जास्त लाभ होईल अशा प्रकारे उर्वरित कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात येईल. या प्रकल्पासाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन निधी

वितरण अथवा अतिरिक्त खर्च करता येणार नाही. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या सूचनांनुसार प्रकल्पाच्या पाणीवापर नियोजनात सुधारणा करण्यात येईल. तसेच डाव्या कालव्यावरील पुच्छ वितरिकेचे काम या प्रकल्प अहवालातून वगळण्यात येईल. त्याऐवजी नागपूर जिल्ह्याच्या काटोल तालुक्यातील मोहगाव (ढोले), मोहगाव (जंगली), भोरगढ, पांढरढाकणी, चौरेपठार, सावळी अनंत व कोल्हू या गावांतील सुमारे ७०० हेक्टर क्षेत्राचा समावेश प्रकल्पीय लाभक्षेत्रात करण्यात येईल. तसेच या क्षेत्रास सौर ऊर्जा आधारित उपसा सिंचन योजनेद्वारे सिंचनाची व्यवस्था करण्यात येईल.

-----०-----

महिला व बालविकास विभाग

## राज्यात नव तेजस्विनी प्रकल्प सहा वर्षांसाठी राबविण्यास मान्यता

राज्यात नव तेजस्विनी अर्थात महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प (Nav Tejaswini-Maharashtra Rural Womens Enterprise Development Project) वर्ष २०१८-१९ ते २०२३-२४ या सहा वर्षाच्या कालावधीमध्ये राबविण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

हा प्रकल्प महिला व बाल विकास विभागाच्या वतीने महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत (माविम) राबविण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय कृषी विकास निधीकडून (IFAD) या प्रकल्पास ५१.६० मिलियन डॉलर (३३५ कोटी ४० लाख) निधी कर्जरुपाने उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. हा कार्यक्रम राबविताना येणाऱ्या प्रशासकीय खर्चासाठी २९.८६ मिलियन डॉलर (१९३ कोटी १५ लाख) इतका निधी राज्य शासनाचा हिस्सा म्हणून उपलब्ध करुन देण्यासही मान्यता देण्यात आली. योजनेच्या प्रस्तावित ५२८ कोटी ५५ लाख रुपयांच्या खर्चाच्या मर्यादेतच अंतिम परिगणना करण्यात येईल. या कार्यक्रमाची अंमलबजावणी “तेजस्विनी-महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण” कार्यक्रमांतर्गत नियमित किंवा कंत्राटी पद्धतीने भरती करण्यात आलेल्या मात्र, अद्याप कार्यरत असलेल्या महिला आर्थिक विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांमार्फतच करण्यात येणार आहे.

-----०-----

सार्वजनिक आरोग्य

## अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे एकवेळचे समावेशन करण्यास मान्यता

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य सेवा संचालनालयमधील अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे (गट-ब) एकवेळचे कायमस्वरुपी समावेशन करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

सध्या वैद्यकीय अधिकारी संवर्गात १०६६ पदे मंजूर असून ६१८ अधिकारी नियमित आस्थापनेवर कार्यरत आहेत. मंजूर पदांपैकी ४४८ पदे रिक्त असून अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांची संख्या ७३८ इतकी मोठी आहे. त्यामुळे प्रथमत: या रिक्त पदांवर त्यांचे सेवाज्येष्ठतेनुसार समावेशन केले जाईल. त्यानंतर राज्याच्या आदिवासी क्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील उपलब्ध ३१५ पदांमधून उर्वरित २९० अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे समावेशन करण्यात येईल. समावेशनाची प्रक्रिया पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून केली जाईल. या अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांचे समावेशन ९३००-३४८०० आणि ग्रेड पे

४६०० रुपये या वेतनश्रेणीच्या प्रारंभिक टप्प्यावर निश्चित करण्यात येईल. त्यांना कोणताही पूर्वलक्षी लाभ मिळणार नाही. ही पदे आयोगाच्या कक्षेतून वगळून विशेष नियमाद्वारे समावेशन करण्यात येईल.

-----०-----

नगर विकास विभाग-१

**मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-३ अे मध्ये**
**राज्य शासनाचा २७ हजार ३८९ कोटींचा आर्थिक सहभाग**

मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-३ अे (MUTP-IIIA) प्रकल्पात राज्य शासनाच्या वतीने २७ हजार ३८९ कोटी रुपयांचा आर्थिक सहभाग देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशनच्या माध्यमातून ५४ हजार ७७७ कोटी रुपयांचा मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-३ अे साकारण्यात येत आहे. या प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या वतीने ५० टक्के म्हणजे २७ हजार ३८९ कोटी रुपयांचा आर्थिक सहभाग देण्यात येणार आहे. यापैकी सात हजार कोटी रुपयांचे बहुपक्षीय कर्जसहाय्य घेण्यास रेल्वेला सहमती देण्यात आली असून त्याची परतफेड तिकिटावरील अधिभारातून करण्यात येईल. या कर्जाव्यतिरिक्त प्रकल्पासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या ॲन्यूईटी, अप फ्रन्ट फंडिंग, लिज फायनान्सिंग अशा मॉडेलच्या माध्यमातून एमआरव्हीसीमार्फत तसेच अर्थसंकल्पीय तरतुदीद्वारे राज्य शासनामार्फत भविष्यात निधी उपलब्ध करुन दिला जाईल. यानुसार राज्य शासन १२ हजार ५६७ कोटी रुपये, एमएमआरडीए ३६३५ कोटी ३० लाख रुपये, सिडको १७९४ कोटी ३० लाख रुपये, एमसीजीएम १७९४ कोटी ३० लाख रुपये आणि एनएमएमसी ५९८ कोटी १० लाख रुपये अस एकूण २० हजार ३८९ कोटी इतका निधी उपलब्ध करणार आहे. एमयुटीपी-३ अे प्रकल्पासाठी एमएमआरडीए, सिडको, एमसीजीएम, एनएमएमसी, वसई-विरार व पनवेल महानगरपालिका तसेच मुंबई महानगर प्रदेशातील अन्य महानगरपालिकांच्या आर्थिक स्थितीचा अंदाज घेऊन त्यांच्याकडून आर्थिक सहकार्य मिळवण्यात येईल. यासंदर्भात आदेश देण्याचे प्राधिकार राज्य शासनाकडे ठेवण्यासही मान्यता देण्यात आली.

गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाच्या डिसेंबर २००० मधील शासन निर्णयानुसार एमयुटीपी टप्पा-१ व २ च्या प्रकल्पग्रस्तांसाठी पुनर्वसन धोरण लागू करण्यात आले आहे. या धोरणानुसारच एमयुटीपी टप्पा-३ व ३ अे मधील प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यास मान्यता देण्यात आली. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येईल. प्राधिकरणाच्या नागरी क्षेत्रात सदनिका उपलब्ध होत नसल्यास नगर विकास विभागाच्या जून २०१८ मधील शासन निर्णयानुसार अतिक्रमणधारकांना एकरकमी मोबदला देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच खाजगी जमिनीवरील प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासंदर्भात एमयुटीपीसाठी लागू केलेल्या पुनर्वसन धोरणाप्रमाणे कार्यवाही करण्यात येणार आहे. प्रकल्पातील पुनर्वसनाचा खर्च हा प्रकल्पावरील खर्च म्हणून दर्शविण्यास मान्यता देण्यात आली.

भारतीय रेल्वे व राज्य शासन यांच्या ५० : ५० टक्के आर्थिक सहभाग तत्त्वावर राबविण्यात येणाऱ्या या प्रकल्पातील कामांचा प्राधान्यक्रम परस्पर समन्वयाने ठरविण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी रेल्वेने त्यांच्याकडील जमिनीच्या विकसनातून उपलब्ध होणाऱ्या निधीमधून ५० टक्के निधी राज्य शासनास देण्याबाबत तसेच या निधीमधून प्रकल्पातील राज्य शासनाचा हिस्सा समायोजित करण्यात येणार आहे. याबाबत रेल्वेकडे स्वतंत्ररित्या मागणी करण्याचे प्राधिकार शासनाकडे ठेवण्यासही मान्यता देण्यात आली.

-----०-----

संसदीय कार्य विभाग

**मुंबई येथे १८ फेब्रुवारी २०१९ पासून**
**अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू करण्याची शिफारस**

महाराष्ट्र विधानमंडळाचे सध्या सुरु असलेले अधिवेशन शुक्रवार दि. ३० नोव्हेंबर २०१८ रोजी दोन्ही सभागृहातील कामकाज समाप्त झाल्यानंतर संस्थगित करण्यासह अर्थसंकल्पीय अधिवेशन सोमवार दि. १८ फेब्रुवारी २०१९ रोजी मुंबई येथे अभिनिमंत्रित करण्याबाबत राज्यपालांना शिफारस करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

-----o-----

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

**राणीसावरगाव येथील होळकर महाविद्यालयातील**
**शारीरिक शिक्षण विषयास अनुदान मंजूर**

परभणी जिल्ह्याच्या गंगाखेड तालुक्यातील राणीसावरगाव येथील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण या विषयास अनुदान मंजूर करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

श्रमजीवी समाज कल्याण मंडळाच्या या महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण विषयासाठी ऑक्टोबर-२०१० च्या विद्यार्थी संख्येवर आधारित एक पद अनुदानास पात्र राहणार आहे. अशा पदावर विहित अर्हता प्राप्त व विधिवत मार्गाने नियुक्त झालेली व्यक्ती पदस्थापित झाली असेल तरच या महाविद्यालयास अनुदान देण्यात येईल. शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटी व निकष पूर्ण होत असल्यासच हे अनुदान दिले जाईल.

-----o-----

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

सामाजिक-आर्थिक-शैक्षणिक उन्नतीसाठी उपयुक्त

**दिव्यांग व्यक्तींसाठीच्या राज्य धोरणास मान्यता**

दिव्यांग व्यक्तींच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक उन्नतीसाठी राज्याचे स्वतंत्र धोरण-२०१८ ची अंमलबजावणी करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

दिव्यांगांमध्ये स्वावलंबी बनण्याची क्षमता विकसित करण्यासाठी या धोरणाचा उपयोग होणार आहे. दिव्यांगांसाठी असणाऱ्या साधनसामग्री व स्रोतांच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे त्यांना समाजात एक मुख्य घटक म्हणून सन्मानाने सामिल होण्याची संधी मिळणार आहे. दिव्यांगांच्या सक्षमीकरणाच्या धोरणात काही अनुषंगिक बदल करावयाचे असल्यास त्याबाबतचे अधिकार मुख्यमंत्र्यांना असणार आहेत.

-----o-----

महसूल विभाग

## माजी सैनिकांच्या दवाखान्यासाठी उस्मानाबाद शहरातील सरकारी जमीन

माजी सैनिकांच्या अंशदायी स्वास्थ्य योजनेच्या (ECHS) दवाखान्यासाठी उस्मानाबाद शहरातील १० आर इतकी सरकारी जमीन नाममात्र दराने दीर्घ मुदतीच्या भाडेतत्त्वावर देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

माजी सैनिकांसाठी असलेल्या केंद्र शासनाच्या अंशदायी स्वास्थ्य योजनेच्या दवाखान्यासाठी उस्मानाबाद शहरातील स.नं. ८/२ मधील १० आर एवढी शासकीय जमीन प्रतिवर्ष एक रुपया या नाममात्र भुईभाड्याने ३० वर्षांसाठी देण्यात येणार आहे. तसेच त्याच तत्त्वावर आणि नियमित अटी-शर्तीनुसार भाडेपट्ट्याचे पुढील नूतनीकरण करण्यासही मान्यता देण्यात आली.

-----०-----

महसूल विभाग

## गंगाखेडमधील गोपीनाथराव मुंडे अन्नछत्रासाठी नगरपरिषदेस १९ आर जमीन देण्यात येणार

परभणी जिल्ह्याच्या गंगाखेडमधील संत जनाबाई मंदिर परिसरात येणाऱ्या भक्तांस सार्वजनिक सुविधा उपलब्ध होण्यासाठी स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे अन्नछत्र सुरू करण्यात येणार आहे. या अन्नछत्राच्या बांधकामासाठी गंगाखेड नगरपरिषदेस १९ आर इतकी जमीन उपलब्ध करून देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

नगरपरिषदेमार्फत ना नफा ना तोटा या तत्त्वावर सुरू करण्यात येणाऱ्या या अन्नछत्रासाठी गंगाखेडमधील सर्व्हे नं. ६४३ मधील २ हेक्टर ६ आर क्षेत्रापैकी १९ आर इतकी जमीन देण्याचा निर्णय घेण्यात आला. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता-१९६६ मधील कलम ४० तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम-१९७१ मधील नियम ५ नुसार शासनास प्राप्त अधिकारानुसार आजचा निर्णय घेण्यात आला आहे. लाभाची अपेक्षा न ठेवता वापर करण्यासह प्रचलित अटी-शर्तींवर ही जमीन भोगवटादार वर्ग-२ या धारणाधिकारावर भोगाधिकार मूल्यरहित व महसूलमुक्त पद्धतीने देण्यास मान्यता देण्यात आली. भोगाधिकार मूल्यरहित व महसूलमुक्त जमीन देण्याची बाब यापुढे पूर्वोदाहरण म्हणून मानण्यात येणार नाही.

-----०-----

विधी व न्याय विभाग

## दिवाणी प्रक्रिया संहिता अधिनियमाच्या कलम ३ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता

दिवाणी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम-२०१८ च्या कलम ३ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. त्यानुसार सध्या सुरु असलेल्या हिवाळी अधिवेशनात विधेयक मांडण्यास अनुमती देण्यात आली.

-----०-----

## ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील बदली कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करणार

मुंबईतील ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील १२ चतुर्थश्रेणी बदली कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयांतर्गत येणाऱ्या विविध संस्थांमधील एकूण ६२६ चतुर्थश्रेणी बदली कर्मचाऱ्यांच्या सेवा यापूर्वी नियमित करण्यात आल्या आहेत. त्याप्रमाणे मुंबईतील ग्रॅन्ट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या आस्थापनेवर तात्पुरत्या नियुक्तीने कार्यरत एकूण १२ चतुर्थश्रेणी बदली कर्मचाऱ्यांच्या सेवा दि. ७ डिसेंबर २०१५ पासून नियमित करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच या तारखेपासून संबंधित कर्मचारी नियमित नियुक्तीने रुजू होईपर्यंतच्या प्रत्यक्ष कालावधीसाठीच्या वार्षिक वेतनवाढीबाबतची थकबाकी त्यांना लागू असणार नाही.

-----०-----